दै. लोकमत दि. 09-05-24

नांदेडात गोळीबाराची मालिका : स्थागुशा, ग्रामीण पोलिसांची कामगिरी

# आरोपींचा पोलिसांच्या दिशेने फायर; पोलिसांनीही केले शूट, तिघे पकडले



हरिदीपसिंग ढिल्लोन



रोहित कौडा



लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** अष्टविनायकनगरात लूट करण्यासाठी एका वृद्धावर गोळीबार करणाऱ्या आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या दिशेने आरोपीने गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांनीही स्वसंरक्षणार्थ आरोपींवर फायर करीत तिन्ही आरोपींना अटक केली. ही थरारक घटना मंगळवारी मध्यरात्री विष्णुपुरी परिसरात घडली.

अष्टविनायकनगर येथे ७ मे रोजी दुपारी ४ वाजता रविंद्र जोशी यांची बॅग हिसकावली. जोशी यांनी प्रतिकार करताच त्यांच्यावर गोळीबार करुन आरोपी फरार झाले होते. विशेष पोलिस महानिरीक्षक शशीकांत महावरकर, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. पोलिस अधीक्षकांच्या आदेशावरुन स्थागुशाचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आरोपींना पकडण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक रवि वाहुळे आणि पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांच्या दोन टीम तयार केल्या. दोन्ही पथके शोधासाठी रवाना झाली. मोबाइल व्हिडिओ आणि सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन फिर्यादीची रेकी करणारा हरदीपसिंग बलदेवसिंग ढिल्लोन (रा.दशमेशनगर, बाफना) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. रोहित सतपाल कौडा (२५, रा.बरीवाला ता.जि.मुक्तसर साहीब, पंजाब) आणि सरप्रितसिंग उर्फ साजन पि. दलबिरसिंग सहोता (रा.अमृतसर, पंजाब) या दोघांच्या मदतीने गुन्हा केल्याचे हरदीपसिंग याने कबूल केले.

उर्वरित दोन्ही आरोपींना पकडण्यासाठी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचेवार, सहायक पोलिस निरीक्षक रवि वाहुळे यांचे पथक ७ मे रोजी रात्री रवाना झाले. ग्रामीण तंत्रनिकेतन विष्णुपुरीच्या पाठीमागे असदवनकडे जाणाऱ्या रस्त्यावर पोलिसांना पाहताच आरोपी पुढे पळाले, एका आरोपीने पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांच्या पथकच्या दिशेने गोळीबार केला. त्यामुळे स्वसंरक्षणार्थ पीएसआय बिचेवार यां... सर्व्हिस पिस्टलमधून ... दिशेने दोन गोळ्या झा... आरोपी सरप्रितसिंग ... पायावर गोळी लागून ते... दुसरा आरोपी रोहित ... यासही पोलिसांनी ... जखमी सतप्रितसिंग... रुग्णालयात उपचार स...

## कामगिरी कौतुकास्पद : श्रीकृष्ण कोकाटे

- पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या संपूर्ण घटनाक्रमाची माहिती पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, स्थानिक गुन्हे शाखा, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस पथक, भाग्यनगर पोलिस ठाण्याचे पथक या सर्वांची कामगिरी कौतुकास्पद आहे.
- घटनेतील आरोपींना २४ तासांत पकडल्याने सर्वसामान्य जनतेचा पोलिसांवरील विश्वास वाढण्यास मदत झाली. मंगळवारी गोळीबारात जखमी झालेले रवींद्र जोशी यांच्या धैर्याचेही कौतुक करतो. यावेळी अपर पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार व इतर अधिकारी उपस्थित होते.

## दोन्ही आरोपी दुर्धर आजाराने ग्रासलेले

१ आरोपी सरप्रितसिंग उर्फ साजन दलबिरसिंग सहोता (२४) आणि रोहित सतपाल कौडा (२५) हे साधारणत: पंधरा दिवसांपूर्वी नांदेडमध्ये आले. दोघेही दुर्धर आजाराने ग्रासलेले आहेत. त्यांना नशा करण्याची सवय आहे. कोणताही कामधंदा करीत नाहीत. नांदेडमध्ये पैशांची कमी भासू लागली. तेव्हा या आरोपींची भेट हरदीपसिंग ढिल्लोन याच्याशी झाली.

२ पैसे मिळवून देण्यासाठीच मंगळवारी ढिल्लोन याने य... त्यांना शहरातील काही बँकांमध्ये... फिरविले. त्यावेळी एक जण बँ... पैसे काढून नेत असल्याचे त्यान... दिसले. भरपूर पैसे असतील, या... आरोपींनी त्यांचा पाठलाग कर... गोळीबार करीत ४० हजार रुप... बॅग पळवून नेली होती. यावेळी... आरोपी नशेत होते, असे कोक... यांनी सांगितले.

## बिचेवार यांनी झाडल्या दोन गोळ्या



आरोपीपैकी एकाने पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचे... यांच्या पथकच्या दिशेने गोळीबार केला. त्यामुळे स्वसंरक्षणार्थ पीएसआय बिचेवार यांनीही त्यांच्या स... पिस्टलमधून आरोपींच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्...

## ४० हजार अन् पिस्टल जप्त

आरोपींनी हिसकावून नेलेल्या बॅगमधील ४० हजार, गुन्ह्यात वापरलेली पिस्टल, चाकू, काळ्या रंगाची एम.एच.२६/सीए ६२०० क्र... स्कुटी, एम.एच.२६/सीई ८०६२ क्रमांकाची कार असा ४ लाख १५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.